# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## मंगळवार, दिनांक ९ जुलै, २०२४

## (सकाळी ११.०० ते ११.४५ वाजता)

**लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(मंगळवार, दिनांक २ जुलै, २०२४, बुधवार, दिनांक ३ जुलै, २०२४, गुरुवार, दिनांक ४ जुलै, २०२४, शुक्रवार, ५ जुलै, २०२४ व सोमवार, दिनांक ८ जुलै, २०२४ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (१)] —**

(१) **डॉ.वजाहत मिर्झा**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने वैद्यकीय अभ्यासक्रम पदवी आणि पदवीधर पदवी तसेच पदविका परीक्षांच्या दोन पेपर्सच्या दरम्यान एक दिवसाची सुट्टी दिली जाणार नाही आणि सलग परीक्षा घेण्यात येणार असल्याचे परिपत्रक दिनांक ४ जून, २०२४ रोजी प्रसिद्ध केल्याचे माहे जून, २०२४ च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस येणे, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने घेतलेला हा निर्णय परिक्षार्थी विद्यार्थ्यांच्या दृष्टीने गैरसोयीचा आणि विद्यार्थ्यांना तीव्र मानसिक त्रास देणारा असणे, सन २०२३ पर्यंत घेण्यात आलेल्या वैद्यकीय परीक्षेच्या प्रचलित पद्धतीनुसार घेण्याची मागणी मार्ड या वैद्यकीय क्षेत्रातील निवासी डॉक्टर्स संघटनेने तसेच इतर विद्यार्थी संघटना व परीक्षार्थी विद्यार्थ्यांनीही मागणी केलेली असणे, वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना दोन पेपर्सच्या दरम्यान एक दिवस सुट्टी मिळाल्यास पुढील विषयाच्या पेपरची तयारी व अभ्यास करण्यासाठी कालावधी मिळणे, परंतु सलग परीक्षा घेतल्यास त्याचा विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक अवस्थेवर परिणाम होऊन विद्यार्थी अनुत्तीर्ण होणे, विद्यार्थ्यांचे मानसिक व शारीरिक आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता अधिक असणे, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने घेतलेल्या या चुकीच्या निर्णयाचा पुनर्विचार करून वैद्यकीय परिक्षार्थी विद्यार्थ्यांना दोन पेपर्स दरम्यान एक दिवस सुट्टी देण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(गुरुवार, दिनांक ४ जुलै, २०२४, शुक्रवार, ५ जुलै, २०२४ व सोमवार, दिनांक ८ जुलै, २०२४ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (२) ते (४)] —**

**(२)** **श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबईतील परळ येथे असलेल्या बी.आय.टी. चाळीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दीर्घकाळ वास्तव्य केले असणे, परळच्या बी.आय.टी. चाळ क्र. १ येथील घर क्र. ५० आणि ५१ हे अनेक ऐतिहासिक घटनांचे साक्षीदार बनले असणे, याच ठिकाणाहून ते इंग्लंड येथील गोलमेज परिषदेला तसेच पुणे करारासाठी गेले असणे, अशा ऐतिहासिक घटनांचे साक्षीदार बनलेल्या या चाळीतील त्यांच्या निवासस्थानाचे आंतरराष्ट्रीय स्मारक करण्याची घोषणा तत्कालीन राज्य सरकारने केली असल्याची बाब निदर्शनास येणे, परंतु तीन वर्षांनंतरही हे स्मारक अद्याप कागदावरच असल्याचे समोर येणे, याठिकाणी स्मारक व्हावे अशी आंबेडकरी चळवळीतील बांधवांकडून मागील अनेक वर्षापासून मागणी केली जात असणे, स्मारक उभारण्यात होत असलेल्या दिरंगाईमुळे आंबेडकरी जनतेच्या मनामध्ये शासनाप्रती निर्माण झालेली असंतोषाची भावना, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वास्तव्याने पावन झालेल्या परळ येथील बी.आय.टी चाळीतील वास्तुचे जतन करण्यासाठी सदर स्मारकाचे बांधकाम लवकरात लवकर सुरू करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**(३)** **सर्वश्री** सुनिल शिंदे, विक्रम काळे, एकनाथराव खडसे, अशोक ऊर्फ भाई जगताप, सत्यजीत तांबे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पुणे येथील कल्याणीनगर एअरपोर्ट रस्त्यावर दिनांक १९ मे, २०२४ रोजी पहाटे एका भरधाव अलिशान चारचाकी गाडीने दुचाकीला दिलेल्या धडकेत दोन निष्पाप अभियंत्याचा झालेला दुर्दैवी मृत्यू, या गाडीच्या अल्पवयीन चालकाने मद्य प्राशन केले असणे, तसेच त्याने गाडी चालविण्याचे प्रशिक्षण घेतले नसणे आणि मोटारवाहन चालवण्याचा परवानाही नसणे, मुलगा अल्पवयीन असतानाही वडीलांनी मुलाला

अमुद्रित प्रत

चालविण्यास दिलेले वाहन, तसेच हॉटेल मालक आणि व्यवस्थापकाने मद्य पुरविण्यापूर्वी मुले अल्पवयीन असल्याची न केलेली खात्री, जळगाव तालुक्यातील रामदेववाडी येथे दिनांक ७ मे, २०२४ रोजी श्रीमंताच्या दोन मुलांनी मद्यधुंद अवस्थेत कारची रेस खेळताना दिलेल्या धडकेत एकाच कुटुंबातील चार जणांचा झालेला मृत्यू, सदर घटनेला एक महिना लोटला तरीदेखील संशयीत आरोपींना पोलीसांनी न केलेली अटक, आरोपींना तात्काळ अटक न केल्यास एमआयडीसी पोलीस ठाण्यावर आक्रोश मोर्चा काढण्याचा स्थानिक नागरीकांनी दिलेला इशारा, या घटनेत गांजा आढळून आलेला असतानाही फिर्यादित त्याचा न केलेला उल्लेख, तसेच नागपूर येथील वाठोडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दिघोरी चौकाजवळ एका कारचालकाने मद्यधुंद अवस्थेत नियंत्रण सुटल्याने फुटपाथवर झोपलेल्या ९ जणांना चिरडल्याची घटना दिनांक १६ जून, २०२४ रोजी वा त्या सुमारास घडली असणे, या घटनेमध्ये दोघांचा मृत्यू झाला असून पाच जण गंभीर जखमी झाले असणे, यामध्ये एका लहान मुलीचा व महिलेचा जागीच मृत्यू झालेला असून उपचारादरम्यान आणखी एकाचा मृत्यू झाल्याची बाब निदर्शनास येणे, या अपघातानंतर गाडीचालक घटनास्थळावरुन फरार झाला असणे, उक्त अपघातांमध्ये कारचालक मद्यधुंद असल्याचे निदर्शनास येणे तसेच याप्रकरणी शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी सर्वसामान्य नागरीकांमध्ये निर्माण झालेली संतापाची भावना व तीव्र असंतोष, यास्तव उक्त प्रकरणी पारदर्शक चौकशी करुन दोषी असलेल्यांवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **श्री.एकनाथराव खडसे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"जळगांव जिल्ह्यातील हतनुर पाटबंधारे प्रकल्पासाठी विशिष्ट तलांकापर्यंत भुसंपादन होणे, पुर्ण पातळीपर्यंत पूर आल्यावर संपादीत जमिनीच्या वरील तलाकांवरील जमिनी पाण्याखाली जाणे, त्या जमिनीतील पिकांचे वारंवार नुकसान होणे, अशा नुकसानग्रस्त जमिनीसाठी भरपाई देणे, अशा जमिनी संपादनासाठी शासनाने दिनांक २१ सप्टेंबर, २०१२ मध्ये स्तुत्य शासननिर्णय घेऊन कार्यवाही करण्याबाबत आदेश देणे, सन २०२२ मध्ये आयआयटी मुंबईकडून याबाबत झालेला अभ्यास, सदर अहवाल स्विकारुन

अप्रकाशित प्रत

ऐनपुर, निंबोल ता.रावेर व मुक्ताईनगर तालुक्यातील शेतजमिनी व निवासी घरे संपादन करण्याची आवश्यकता तसेच सन १९५९ मध्ये जळगांव जिल्ह्यात पूर्णा नदीला आलेल्या महापुरात नदीकाठावरील मुक्ताईनगर तालुक्यातील ११ गावे युध्द पातळीवर स्थलांतरीत करणे, सदर गांवांना पुरग्रस्त म्हणुन असलेला दर्जा, अद्यापही या गावांच्या भुमी अभिलेख विभागाकडे नोंद न करणे, मालमत्तेचे ७/१२ उतारा मिळत नसल्याने खरेदी-विक्रीचे व्यवहार न होणे, सदर गावांना प्रकल्पग्रस्त दर्जा देऊन प्रकल्पग्रस्त दाखले व नागरी सुविधा देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(सोमवार, दिनांक ८ जुलै, २०२४ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (५) ते (१०)] —**

(५) **श्री.अरुण लाड**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात २२०० खाजगी उपसा जलसिंचन योजना असणे, शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने या योजनांचा पैसा उभा केला असून काही शेतकऱ्यांनी आपली घरे व शेतीवाडी बँकांकडे गहाण ठेऊन या सिंचन योजना उभ्या करणे, परंतु शासनाने नुकतीच पाणीपट्टी दरवाढ केल्यामुळे या योजनेतील शेतकऱ्यांवर केलेला अन्याय, परिणामी, या शेतकऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, खाजगी उपसा सिंचन योजनांचे राज्याच्या विकासासाठी योगदान विचारात घेता शासनाने या योजनांना मदत करावी व या योजनांसाठी शेतकऱ्यांनी घेतलेले कर्ज माफ करावे अशी शेतकऱ्यांची होत असलेली मागणी, शासनाने वाढविलेली पाणीपट्टी दरवाढ त्वरित रद्द करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **सर्वश्री अशोक ऊर्फ भाई जगताप**, सत्यजीत तांबे, अभिजीत वंजारी, प्रसाद लाड, सतेज ऊर्फ बंटी पाटील **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई शहरामध्ये बी.ई.एस.टी. च्या मार्फत वीज पुरवठा करीत असणे, मुंबई शहरामध्ये १०.५० लाख ग्राहक असणे, त्यामध्ये ७० टक्के

अस्वाक्षरित प्रत

घरगुती तसेच ३० टक्के उद्योग धंद्यांसाठी वीज पुरवठा करण्यात येत असल्याचे माहे जून, २०२४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले असणे, सर्व ग्राहकांनी स्मार्ट मीटर लावणे आवश्यक असल्याचा निर्णय बेस्ट प्रशासनाने घेतला असल्याचे समजते, त्यांच्या आदेशानूसार ४ महीन्यांपासून रहिवाश्यांना स्मार्ट मीटर लावण्याचे काम सुरु असणे, इलेक्ट्रीक अधिनियम, २००३ च्या तरतूदीनूसार ज्या ठिकाणी ग्राहकाला चांगल्या सुविधा मिळतील त्या वीज कंपन्यांकडून ते वीज घेऊ शकतात, याबाबत कोणीही नागरिकांना जबरदस्ती करु शकत नसणे, सायन कोळीवाडा विभागात ज्या नागरिकांनी स्मार्ट मीटर लावले असणे त्यांच्याकडे मीटरचे पैसे मागितले जात असणे तसेच स्मार्ट मीटर लावल्यानंतर ग्राहकांना ५ पटीने जास्त वीजेची बिल येत असल्याच्या तक्रारी स्थानिक रहिवाश्यांकडून करण्यात येणे, तसेच महावितरणाकडून राज्यातील २.२५ कोटी वीज ग्राहकांना स्मार्ट प्रीपेड मीटर्स लावण्यासाठी २७००० कोटी रुपये म्हणजे प्रति मीटर १२००० खर्च केले जाणे, यापैकी २००० कोटी म्हणजे प्रति मीटर फक्त रुपये ९०० अनुदान केंद्र सरकारकडून मिळणे, उरलेली सर्व रक्कम महावितरण कंपनीला कर्जरुपाने उभी करावी लागणार असल्याने खर्चाची भरपाई वीजग्राहकांना दरवाढीच्या स्वरुपात मोजावी लागणे, याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याची विनंती रहिवाशांनी शासनाकडे करणे, परंतु, शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे स्मार्ट मीटर्सला होणारा विरोध लक्षात घेता स्मार्ट मीटर लावण्याबाबतचा निर्णय तातडीने रद्द करुन नागरिकांना योग्य न्याय देण्यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(७)** **श्री.गोपिचंद पडळकर**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत मोठ्या प्रमाणात गैरकारभार झाला असल्याचे माहे जून, २०२४ च्या सुमारास निदर्शनास येणे, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत बोगस कर्ज वाटप केलेल्या कर्जदार संस्था व संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याची आवश्यकता, बोगस दाखल्यांच्या आधारे भरती झालेल्या तांत्रिक अधिकाऱ्यांना बडतर्फीची कारवाई करण्याची आवश्यकता, बँकेच्या ताब्यात असलेली मालमत्ता परस्पर वापरण्यात येत असून याबाबतची चौकशी करण्याची होत असलेली मागणी, यांसह इतर अन्य मागण्यांसाठी स्थानिक लोकप्रतिनिधी, शेतकरी संघटना,

अप्रकाशित प्रत

शेतकऱ्यांकडून चाबूक मोर्च्याचे आयोजन दिनांक २५ जून, २०२४ रोजी सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेसमोर करण्यात येणे, उक्त मागणीच्या अनुषंगाने याबाबत शासनाने तातडीने करावायची कार्यवाही व उपाययोजना."

(८) **श्री.आमश्या पाडवी**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नंदुरबार जिल्ह्यात अतिदुर्गम व १०० % आदिवासी बहुल असलेल्या अक्कलकुवा तालुक्यातील मोलगी येथे अप्पर तहसील कार्यालय निर्मिती करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींसह नागरिकांकडून होत असणे, तालुक्याच्या ठिकाणाहून वसलेली गावे सुमारे ८० ते ९० कि.मी. दूर असल्याने नागरिकांना दैनंदिन शासकीय कामासाठी ये-जा करणे गैरसोईचे होत असून या प्रवासामुळे त्यांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागणे, तसेच नर्मदा नदीच्या काठी वसलेली अनेक गावे शासकीय योजनांपासून देखील वंचित असणे, अप्पर तहसील कार्यालय निर्मिती झाल्यास नागरिकांना सोयीचे ठरणार असणे, सद्य:स्थितीत मोलगी येथे सार्वजनिक बांधकाम विभाग, उप अभियंता कार्यालय, वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालय, ग्रामीण रुग्णालय, पोलीस ठाणे, शासकीय धन्य गोदाम, डाक कार्यालय इत्यादी महत्त्वाची कार्यालये कार्यरत असणे, त्यामुळे अप्पर तहसील कार्यालय निर्मित्तीसाठी पोषक पायाभूत सुविधा उपलब्ध असणे, त्यामुळे शासनाने पायाभूत सुविधा लक्षात घेता अक्कलकुवा तालुक्यातील एकूण १९४ गावांपैकी सुमारे ८४ गावे वेगळी करून अप्पर तहसील कार्यालय निर्मिती होण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक १० एप्रिल, २०२३ रोजी विभागीय आयुक्त यांचे मार्फत शासनाकडे सादर केलेला असणे, सदरहू प्रस्ताव अद्यापही शासनाकडे कार्यवाहीविना प्रलंबित असणे, परिणामी स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेले नैराश्याचे वातावरण, नागरिकांच्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने तातडीने अक्कलकुवा तालुक्याचे विभाजन करून अक्कलकुवा व मोलगी असे दोन वेगवेगळ्या तालुक्यांची निर्मिती करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

अग्रिम प्रत

(९) **सर्वश्री अमोल मिटकरी,** विक्रम काळे, सतिश चव्हाण, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कामगार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नागपूर-अमरावती महामार्गावरील धामणा येथील चामुंडी एक्स्लोसिव्ह या कंपनीत दिनांक १३ जून, २०२४ रोजी भीषण स्फोट होणे, या स्फोटात सहा जणांचा दुर्दैवी मृत्यु होऊन सुमारे १० जण गंभीर जखमी होणे, सदर स्फोटाच्यावेळी कंपनीत शिकाऊ कामगार कामाला असल्याचे तसेच कंपनीत कामगारांसाठी कोणतीही सुरक्षा व्यवस्था नसणे, सदर स्फोटाप्रकरणी पोलिसांनी तपास करण्यात येणे, परंतु स्फोटामागील नेमके कारण ज्ञात न होणे, सदरच्या काळात कंपनीचे व्यवस्थापक व मालक फरार झाल्याचे निदर्शनास येणे, सदर घटनेनंतर तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी स्फोटाच्या ठिकाणी येऊन घटनेची माहिती घेणे व स्फोटात मृत्युमुखी पडलेल्यांच्या नातेवाईकांना शासनाकडून रुपये २५ लाख तर कंपनीकडून ५० लाख रुपयांची मदत देण्याबाबतची मागणी करण्यात येणे, दरम्यानच्या काळात "मृतांच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आर्थिक मदत करण्यात येईल" असे उप मुख्यमंत्री (गृह) यांचेकडून जाहीर करण्यात येणे, तथापि याखेरीज कंपनी मालकाकडून आर्थिक मदत व अन्य बाबींसंदर्भात कोणताही खुलासा न होणे, परिणामी, कामगारांमध्ये कंपनीविरुध्द पसरलेली संतापाची लाट व उद्वेगाची भावना, त्याप्रकरणी शासनाने चौकशी करुन कंपनीविरुध्द कारवाई करण्याची तसेच आर्थिक मदतीबाबत कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

(१०) **श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"शासनाच्या शिक्षण विभागाच्या शासन परिपत्रकानुसार स्वयं अर्थसहाय्य तत्वावर मान्यता प्राप्त शाळांना इयत्ता ६ वी ते १२ वी अशी दर्जावाढ तसेच इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंत नवीन परवानगीसाठी लागणारी अट, ३१ वर्षाचा नोंदणी करारनामा शिथिल करण्याची आवश्यकता, रुपये १५ लाखांची मुदतठेव व चलन रुपये दीड लाख भरण्याची असलेली जाचक अट, याबाबतचे संस्था चालकांचे प्रस्ताव शासन स्तरावर सन २०२० पासून प्रलंबित असणे, सन २०१० ते २०१९ पर्यंत शासनाने ५ हजार चलन व ५

अप्रकाशित

वर्षाचा करारनामा व मुदतठेव रक्कम ५ लाख रुपये या अटी पुन्हा लागू करणे, इरादा पत्र न देता प्रत्यक्षात परवानगी देण्यात यावी, अशी मागणी असणे, दिनांक ३० ऑगस्ट, २०२३ रोजी महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाचे अध्यक्ष, अधिकारी व सर्व संस्था चालकांच्या बैठकीत वरील अटी शिथिल करण्याबाबत चर्चा होणे, शिक्षण मंत्र्यांकडे सदर जाचक अटी शिथिल करण्याबाबतचा प्रस्ताव पाठविला जाणे, परंतु अद्याप या प्रश्नांवर कोणताही निर्णय न घेणे, त्यामुळे संस्थाचालकांमध्ये व शाळेमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांमध्ये शिक्षण विभागाच्या प्रती चीड व असंतोष निर्माण होणे, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक** : **ॲड.अनिल परब, वि.प.स. यांच्या राजीनाम्याची घोषणा**

**दोन** : **नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी**

**तीन** : **नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय**

**चार** : **प्रश्नोत्तरे**

**पाच** : **कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे –**

**(१) संसदीय कार्य मंत्री** : विधानपरिषदेच्या सन २०२४ च्या दुसऱ्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ ते दिनांक १ मार्च, २०२४ या कालावधीत मा.मंत्री महोदयांनी विधानपरिषद सभागृहात दिलेल्या एकूण २५ आश्वासनांची यादी, तसेच सन २०२४ चे दुसरे (अर्थसंकल्पीय) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर, पूर्तता करण्यात आलेल्या एकूण १२८ आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे यादीसह, विधानपरिषदेच्या सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

अस्वीकृत प्रत

**(२) उद्योग मंत्री** : "महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचे सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे अठ्ठावन्नावा व एकोणसाठावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(३) रोजगार हमी योजना मंत्री** : "महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- महाराष्ट्र व राज्य रोजगार हमी योजना यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**सहा : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने —**

**(शुक्रवार, दिनांक ५ जुलै, २०२४, व सोमवार, दिनांक ८ जुलै, २०२४ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने) — [अनुक्रमांक (१) व (२) ] —**

(१) **श्री.सुनिल शिंदे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ५** वर **मुख्यमंत्री** निवेदन करतील :-

"मुंबईच्या अनेक विभागात होत असलेल्या अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे मुंबईकरांना भेडसावत असलेल्या भीषण पाणीटंचाईबाबत."

(२) **श्री.जयंत पाटील, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक १** वर **महसूल मंत्री** निवेदन करतील :-

"रायगड जिल्ह्यातील पेण व खालापूर तालुक्यातील देहेन ते नागोठणे येथील इथेन गॅस प्रकल्पातील बाधित शेतकऱ्यांच्या संपादित शेतजमिनींच्या व पिकांच्या झालेल्या नुकसान भरपाईचा मोबदला प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना मिळण्याबाबत."

**(सोमवार, दिनांक ८ जुलै, २०२४ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने) — [अनुक्रमांक (३) ते (६) ] —**

(३) **श्री.शशिकांत शिंदे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक

अग्रिम प्रत

महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ७** वर **उप मुख्यमंत्री** निवेदन करतील :-

"राज्यातील पोलीसांची हजारो पदे रिक्त असल्यामुळे पोलीस भरती करण्याबाबत."

(४) **श्री.राजेश राठोड, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ८** वर **उप मुख्यमंत्री** निवेदन करतील :-

"लोणावळा (जि.पुणे) येथील भुशी धरणाच्या धबधब्यात एका कुटूंबातील ५ जण वाहून गेल्याची घडलेली घटना."

(५) **श्री.जयंत पाटील, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ६** वर **उप मुख्यमंत्री** निवेदन करतील :-

"रायगड जिल्ह्यातील खारेपाट विभागातील बाधित शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईबाबत."

(६) **श्री.अंबादास दानवे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ९** वर **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** निवेदन करतील :-

"राज्यातील बेरोजगारांना रोजगार मिळण्याच्या दृष्टीने शासनाच्या योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत."

**सात : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

## - मध्यंतर -

**आठ : सन २०२४-२०२५ च्या अतिरिक्त अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.**
**(चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) —**

**नऊ : शासकीय विधेयक —**

**विधानसभेने संमत केल्यास — विधेयक विचारात घेणे :-**

अमुद्रित प्रत

"सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक १७ - महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०२४"

---

**दहा : सन २०२४-२०२५ च्या पुरवणी मागण्या सादर करणे**

**अकरा : शासकीय विधेयके –**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

**(१)** "सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ – महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२४"

**(२)** "सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ – महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०२४"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, अभिजीत वंजारी, अशोक ऊर्फ भाई जगजाप, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ – महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०२४" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**बारा : (सोमवार, दिनांक ८ जुलै, २०२४ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला मा.मुख्यमंत्री यांचा म.वि.प. नियम १०६ अन्वये ठराव) –**

मध्य रेल्वे मार्गावरील :- करी रोड रेल्वे स्थानकाचे नाव - लालबाग रेल्वे स्थानक

सॅन्डहर्स्ट रोड रेल्वे स्थानकाचे नाव - डोंगरी रेल्वे स्थानक

अप्रकाशित प्रत

पश्चिम रेल्वे मार्गावरील :- मरीन लाईन्स रेल्वे स्थानकाचे नाव - मुंबादेवी रेल्वे स्थानक
चर्नी रोड रेल्वे स्थानकाचे नाव - गिरगांव रेल्वे स्थानक

हार्बर रेल्वे मार्गावरील :- कॉटन ग्रीन रेल्वे स्थानकाचे नाव - काळा चौकी रेल्वे स्थानक
सॅन्डहर्स्ट रोड रेल्वे स्थानकाचे नाव -डोंगरी रेल्वे स्थानक
डॉकयार्ड रोड रेल्वे स्थानकाचे नाव - माझगांव रेल्वे स्थानक
किंग्ज सर्कल रेल्वे स्थानकाचे नाव — तीर्थंकर पार्श्वनाथ रेल्वे स्थानक

यांप्रमाणे बदलण्यात यावे, अशी शिफारस, महाराष्ट्र विधानपरिषद, याद्वारे केंद्र शासनास करीत आहे.

**तेरा : (क) (मंगळवार, दिनांक २ जुलै, २०२४, बुधवार, दिनांक ३ जुलै, २०२४, गुरुवार, दिनांक ४ जुलै, २०२४, शुक्रवार, ५ जुलै, २०२४ व सोमवार, दिनांक ८ जुलै, २०२४ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**श्री.प्रविण दरेकर**, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रसाद लाड, आमश्या पाडवी, अमोल मिटकरी, चंद्रशेखर बावनकुळे, विक्रम काळे, सतीश चव्हाण, रणजितसिंह मोहिते-पाटील, प्रा.राम शिंदे, सर्वश्री श्रीकांत भारतीय, रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री प्रविण दटके, रामराव पाटील, रमेश कराड, गोपिचंद पडळकर, वसंत खंडेलवाल, अमरीशभाई पटेल, ज्ञानेश्वर म्हात्रे, राजहंस सिंह, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव — (मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यातील शेतकरी व सर्वसामान्य जनतेचे कल्याण हे एकमेव ध्येय समोर ठेवून व नारी शक्ती आणि युवा शक्तीला प्राधान्य देऊन "शासन आपल्या दारी" या अभियानाच्या माध्यमातून महाराष्ट्र गतीमान ठेवण्याचा,

अमुद्रित प्रत

जनकल्याणाचा वसा घेतलेल्या या शासनाचा प्रयत्न असणे, राज्यात एकीकडे दुष्काळाची होरपळ तर दुसरीकडे वादळी पाऊस, गारपीटीचा कहर सुरु असणे, खरेतर उन्हाळी तसेच रब्बी आणि खरीप अशा तिन्ही हंगामांवर नैसर्गिक आपत्तीनी घाला घातला असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे शेत पिकांचे खुप नुकसान झाले असल्याची वस्तुस्थिती असणे, राज्यात कमी पाऊस असलेल्या आणि जनावरांचा चाऱ्याचा प्रश्न निर्माण झालेल्या राज्यातील १२४५ महसुली मंडळात बारा छावण्या उभारण्यास शासनाने परवानगी दिली असणे, कांद्याला योग्य भाव मिळावा याकरिता कांद्याचे दर ठरविण्याचे अधिकार केंद्राच्या ग्राहक संरक्षण मंत्रालयाने स्वतःकडे ठेवले असणे, स्वर्गीय वसंतराव नाईक शेती स्वावलंबी मिशनला मजबुत करून शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी टास्क फोर्सला बळकट करण्याचा निर्णय शासनाने घेतला असणे, कापसासाठी ५०० व सोयाबीनसाठी २७० शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला असणे, धानाला २० हजार रुपये बोनस देण्याचा निर्णय घेतल्याने त्याचा ६ लाख शेतकऱ्यांना लाभ मिळू शकेल अशी तरतूद करण्यात येणे, शेतकऱ्यांकरिता "नमो शेतकरी महासन्मान निधी" योजना राबविण्यासाठी ५ हजार ७०० कोटींची तरतूद करून त्याचा पहिला हप्ता शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा झाल्याचे निदर्शनास येणे, नुकसानीचे पंचनामे जलद व पारदर्शी होण्यासाठी ई-पंचनामा प्रणाली संपूर्ण राज्यात लागू करण्यात आली असणे, शेतकऱ्यांना दिवसा अखंडीत वीज पुरवठा करण्यासाठी "मागेल त्याला सौरऊर्जा पंप" उपलब्ध करून देण्याचा शासनाने निर्णय घेतला असणे, केवळ १ रूपयात पिक विमा योजना राबविण्यात येत असल्याने खरीप हंगामासाठी राज्यातील १ कोटी ७० लाख व रब्बी हंगामासाठी ६६ लाख अशा एकूण २ कोटी २३ लाख शेतकऱ्यांनी पिक विमा योजनेत विक्रमी सहभाग नोंदविला असल्याचे निदर्शनास येणे, शेतकऱ्यांना दिलासा देण्याकरिता एनडीआरएफच्या दराच्या दुप्पट दराने शेतकऱ्यांना मदत देण्याचा निर्णय शासनाने घेतला असणे, अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या पिकांच्या नुकसानाकरिता ७,१९६ कोटी रुपये इतका निधी मंजूर केला असणे, कमी पाऊस झालेल्या राज्यातील १,०२१ महसूल मंडळात दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहिर करण्यात येऊन तेथील शेतकऱ्यांना कर्जाचे पुनर्गठन, चालू वीज बिलात ३३.५ टक्के सूट यासारख्या विविध ८ सवलती लागू करण्यात आल्या असल्याचे निदर्शनास येणे, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेत पहिल्या टप्प्यात ४ हजार कोटी रुपयांचा

अग्रिम प्रत

निधी वाढवून आता ५,४६९ कोटी एवढा करण्यात आला असणे, राज्यात प्रथमच कांदा महाबैंक हा पथदर्शी प्रकल्प सुरु करण्यात आला असणे, विदर्भातील नागपूर, काटोल, कळमेश्वर, मोर्शी, बुलढाणा येथे आधुनिक संत्र प्रक्रिया केंद्रे उभारण्याकरिता सुमारे २० कोटी रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली असल्याचे निदर्शनास येणे, भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेतील २,१२९ लाभार्थ्यांना ७ कोटी ५१ लाख रुपयांचा निधी दिला असल्याचे निदर्शनास येणे, "मागेल त्याला शेततळे" योजनेचा विस्तार करून मागेल त्याला फळबाग, मागेल त्याला ठिबक व तुषार सिंचन, मागेल त्याला शेततळ्याचे अस्तरीकरण, मागेल त्याला आधुनिक यंत्र, कॉटन श्रेडर इ. देण्याचा निर्णय करुन त्याकरिता १ हजार कोटी यावर्षी खर्च करण्याचा शासनाचा मानस असणे, पारंपारिक शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत शेतकरी वर्गाचा आर्थिक आधार बळकट करण्याकरिता मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प राज्यात कार्यान्वित केला असणे, त्यायोगे राज्यातील लहान आणि सिमांत शेतकरी तसेच कृषी नवउद्योजकांना केंद्रस्थानी ठेऊन शेतमालाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी शेतकरी ते खरेदीदार अशी मूल्यसाखळी विकसित करणे हा या प्रकल्पाचा उद्देश असणे, कृषी, शिक्षण, संशोधन आणि विद्यापीठांची संरचना आणि कार्यपध्दती अभ्यास करण्यासाठी माजी कुलगुरु डॉ. राजाराम देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असणे, राज्यातील सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी विशेष मोहिम राबविण्याचे प्रस्तावित असून त्यायोगे २ वर्षात ६१ सिंचन प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षित असणे, वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प कार्यान्वित केल्याने नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला व बुलढाणा जिल्हयातील सुमारे ३ लाख ७१ हजार २७७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणे, जलयुक्त शिवार अभियानांकरिता ६०० कोटी रूपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली असणे, स्वच्छ व हरित ऊर्जेचे ध्येय साध्य करण्यासाठी जनाई-सिरसाई, पुरंदर यांसह सर्व शासकीय उपसा जलसिंचन योजनाचे सौरउर्जिकरण करण्यात येत असून त्याकरिता ४ हजार २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असणे, म्हैसाळ, (जि.सांगली) येथे पथदर्शी सौरऊर्जा प्रकल्प राबविण्यात आल्याने सांगली आणि सोलापूर जिल्हयातील सुमारे ७५ हजार शेतकरी कुटुंबियांना याचा लाभ मिळाला असणे, कोल्हापूर आणि सांगली जिल्हयातील पुरामुळे होणारी जिवित व वित्तहानी टाळण्याकरिता आणि अतिरिक्त पाणी दुष्काळग्रस्त भागात

असुधारित प्रत

वळविण्याकरिता जागतिक बँकेच्या सहाय्याने ३ हजार २०० कोटी रूपये किंमतीचा महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम राबविण्यात येणे, राज्यात गरजू महिलांना ओळखण्यासाठी व त्यांना सक्षम करण्यासाठी "नारी शक्ती दुत ॲप" हे एक क्रांतिकारी ॲप्लीकेशन राबविण्यात येत असणे, राज्यातील महिलांना कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन आणि उद्योजकता विकासासाठी सक्षम करण्याकरिता "पंतप्रधान नमो महिला सशक्तीकरण अभियान" राबविण्यात येत असणे, "मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना" राबविण्यात येऊन त्यायोगे २१ ते ६० वयोगटातील पात्र महिलांना दरमहा १५०० रुपये निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला असणे, "शुभमंगल सामुहिक नोंदणीकृत विवाह" योजनेत लाभार्थी मुलांना देण्यात येणारे अनुदान १० हजार रुपयांवरून २५ हजार रूपये करण्यात येणे, "मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना" या माध्यमातून पात्र कुटुंबाला वर्षाला ३ गॅस सिलेंडर मोफत देण्याचे घोषित करण्यात आले असणे, महिला बचत गटानी उत्पादित केलेल्या वस्तूंना "उमेद मार्ट" आणि "ई-कॉमर्स ऑनलाईन प्लॅटफॉर्म" याद्वारे यावर्षात २५ लाख महिलांना लखपती करण्याचा उद्देश शासनाने ठेवला असणे, सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून मुलींना मोफत उच्च शिक्षण देण्याचा निर्णय शासनाने घेतला असणे, प्रतिवर्षी १० लाख तरुण-तरुणींना प्रत्यक्ष कामावरील प्रशिक्षण देण्यासाठी "मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना" राबविण्यात येत असणे, मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, यवतमाळ, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, कराड, अवसरी खुर्द, जि. पुणे येथील तंत्रशिक्षण संस्थांमध्ये "सेंटर ऑफ एक्सलन्स" स्थापन करण्यात येणार असणे, राज्यातील बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत इ. संस्थांमार्फत एकूण २ लाख ५१ हजार ३९३ विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुक प्रशिक्षण देण्यात आले असून त्यायोगे ५२ हजार ४०५ विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी प्राप्त झाल्या असणे, महापे, नवी मुंबई येथे २५ एकर जागेवर "इंडिया जंग्स ॲन्ड ज्वेलरी पार्क" उभारून त्यायोगे १ लाख रोजगार निर्मिती करण्याचा शासनाचा प्रयत्न असणे, सिंधुदुर्ग जिल्हयात स्थानिकांना रोजगार उपलब्ध करण्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्कुबा ड्रायव्हिंग केंद्र उभारण्याकरिता २० कोटी रुपये खर्चाची तरतूद करण्यात आली असणे, गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार विकास महामंडळामार्फत ऊसतोड कामगारांच्या मुलां-मुलींसाठी ८२ शासकीय वसतीगृहे स्थापन करण्यास शासनाने मंजुरी दिली असणे, राज्यात पर्यटनाला चालना देण्यासाठी शाश्वत पर्यटन धोरण आखण्यात येत असणे,

अस्वाक्षरित प्रत

राज्यातील ५० नवीन पर्यटन स्थळांची निवड करून त्या ठिकाणी थीम पार्क, ॲडव्हेंचर स्पोर्ट, शॉपिंग मॉल, वॉटर मॉल आणि निवास व्यवस्था करण्यात येत असणे, बुलढाणा येथील लोणार, अंजिठा-वेरूळ, कळसूबाई, त्र्यंबकेश्वर तसेच कोकणातील सागरी किल्ल्यांच्या ठिकाणी पर्यटकांसाठी उच्च दर्जाच्या सुविधा निर्माण करण्यात येत असणे, सातारा येथील शिवसागर जलाशय, भंडारा येथील गोसीखुर्द जलाशय तसेच जळगाव येथील वाघुर जलाशय येथे नाविन्यपूर्ण जलपर्यटन प्रकल्प राबविण्यात येत असणे, कोकणातील पर्यटनास चालना देण्यासाठी शिवकालीन ३२ गडकिल्ल्यांचे नुतनीकरण व संवर्धन करण्याचे प्रस्तावित असणे, राज्यातील पर्यटकांना व भाविकांना योग्य दरामध्ये उत्तम व सुरक्षित सुविधा पुरविण्यासाठी श्रीनगर, जम्मु काश्मीर आणि अयोध्या येथे महाराष्ट्र भवन बांधण्याचा निर्णय घेतला असणे, छत्रपती शिवाजी महाराज यांचा  पूर्णाकृती पुतळा राज्याच्या सीमेवर बांधणे, छत्रपती शिवाजी महाराज यांची  वाघनखे राज्यात आणणे,  बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना योजनेमध्ये समाविष्ठ १४० चाचण्यांमध्ये वाढ करणे तसेच, आपला दवाखाना योजनेची व्याप्ती वाढवून ती मुंबईबाहेरही राज्यभर करण्याची आवश्यकता, विकसित महाराष्ट्राचा ध्यास घेऊन राज्यात शेतकरी, शेतमजूर, महिला व युवकांना बळकट करण्यासाठी व लोककल्याणकारी राज्य निर्माण करण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(ख) **सर्वश्री प्रविण दरेकर**, विक्रम काळे, चंद्रशेखर बावनकुळे, सतीश चव्हाण, आमश्या पाडवी, विजय ऊर्फ भाई गिरकर, अमोल मिटकरी, प्रसाद लाड, रामराजे निंबाळकर, डॉ.मनिषा कायंदे, श्री.निरंजन डावखरे, प्रा.राम शिंदे, सर्वश्री श्रीकांत भारतीय, राजहंस सिंह, रणजितसिंह मोहिते-पाटील, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री रमेश कराड, निलय नाईक, प्रविण दटके, ज्ञानेश्वर म्हात्रे, रमेशदादा पाटील, रामराव पाटील, अमरीशभाई पटेल, गोपिचंद पडळकर, वसंत खंडेलवाल, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"मागील दोन वर्षांच्या काळात मुंबईसह एमएमआरडीए भागात पर्यावरणपूरक व गतीमान दळणवळण आणि गृहनिर्माण तसेच, झोपडपट्टी निर्मूलन हे मुद्दे प्रधान्याने विचारात घेऊन व विकासास केंद्रबिंदू मानुन मुंबई,ठाणे, पुणे, नागपूर व छत्रपती संभाजीनगर सारख्या मोठया शहरात

अप्रकाशित प्रत

स्थानिकांचे जीवनमान उंचावण्यावर भर देऊन विकासाची नियोजनात्मक कालबध्द कामे हाती घेण्यात आली असल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई, ठाणे, पुणे ही शहरे खड्डेमुक्त करण्याची संकल्पना प्रत्यक्षात आणण्याच्यादृष्टीने तेथील सर्व महत्वाच्या रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करण्याचा निर्णय घेण्यात येणे, मुंबई व ठाण्यासह उपनगरातील धोकादायक इमारतींचा समुह विकास करण्याच्या दृष्टीने मोठया प्रमाणावर प्रकल्प राबविण्यात येणे, मुंबईतील रेल्वे स्थानकांच्या दोन्ही बाजूकडील झोपड्डीधारकांच्या पात्रता निश्चित करण्यासाठी एक खिडकी व कालबध्द स्थालांतरण योजना राबविण्याची तसेच, एसआरए प्रकल्पबाधितांच्या न्यायप्रविष्ठ प्रकरणाबाबतीतील शासनाचे धोरण निश्चित करण्याची आवश्यकता, मुंबईतील भेंडीबाजार, धारावीसारख्या गजबजलेल्या भागांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने उभारण्यात येणारे एसबीयुटी सारखे गृहनिर्माण प्रकल्प नागरी पुनरूत्थान घडविणारे असल्याचे निदर्शनास येणे, जुन्या चाळींची व्याख्या बदलून हेरीटेज टीडीआर प्रत्यक्ष अंमलात आला असणे, स्वयंपुनर्विकासाच्या माध्यमातून गृहनिर्माण प्रकल्प अधिक गतीमान करण्यासाठी मुंबई जिल्हा बँकेकडून देण्यात येणा-या कर्ज मर्यादेत वाढ करण्यात आली असणे, एमएमआरडीए क्षेत्रात सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासासाठी मुंबई जिल्हा बँकेला नोडल एजन्सी म्हणून मान्यता देण्यात येणे, मानीव हस्तांतरण करण्यासाठी स्टॅम्प ड्युटी भरण्यात सुलभता होण्यासाठी मुद्रांक शुल्क अभय योजना सुरू करण्यात येणे, मुंबईतील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पांतर्गत त्या परिसरातील अनिवासी झोपडीधारक, स्टॉलधारक यांची पात्रता निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू असणे, बीडीडी चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पांना प्रेत्साहन मिळावे यासाठी संबंधित पुनर्विकासाच्या करारनाम्यावर फक्त १ हजार रुपये मुद्रांक शुल्क घेण्याचा निर्णय घेण्यात येणे, झोपडपट्टी पुनर्वसनातील सदनिका हस्तांतरण शुल्कात ५० टक्के कपात करण्याचा निर्णय घेण्यात येणे, ठाणे शहरात एमआयडीसीच्या अभिन्यासामधील भूखंडावर जगातील सर्वात मोठा क्लस्टर प्रकल्प राबविण्यात येणे, म्हाडाकडून पुनर्विकास होणा-या इमारतींतील रहिवाशांना तसेच, झोपडीधारकांना विकासकांविरूध्द महारेरामध्ये अपील करण्याचा अधिकार देण्याची आवश्यकता, इमारत पुनर्विकास करताना केलेल्या कराराप्रमाणे तेथील भाडेकरुंना पुनर्विकास प्रकल्प पूर्ण होईपर्यंत अनेक विकासकांकडून भाडे देण्यात येत नसल्याची बाब निदर्शनास येणे,

अप्रकाशित प्रत

मुंबईतील पोलीस कर्मचाऱ्यांना पुरेशी निवासस्थाने उपलब्ध करुन देण्यासाठी दिर्घकालीन, मध्यमकालीन व तात्काळ अशा तीन टप्प्यांवर उपाययोजना करण्याचा तसेच, म्हाडाच्या मदतीने मुंबईतील पोलीस निवासस्थानांचा पुर्नविकास करण्याचा शासनाने निर्णय घेतला असणे, बंद पडलेल्या गिरण्यांमधील कामगारांना शासनाकडून घरे देण्याची योजना अधिक गतीमान करण्याची आवश्यकता, पुण्यातील सहकारी गृहनिर्माण सोसायट्या व गृहनिर्माण मंडळाच्या वसाहतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करून पुनर्विकास करण्याची आवश्यकता, पीएमआरडीएच्या माध्यमातून पुणे शहरातील डीपी प्लॅन व रिंगरोड नव्याने तयार करण्याची आवश्यकता, पुणे शहरात विमानतळाकरिता जागा राखीव असून अन्य पायाभूत सुविधा तातडीने करण्याची आवश्यकता, स्वारगेट ते कात्रज, खडकवासला ते हडपसर मेट्रो रेल्वेच्या कामाला गती देण्याची आवश्यकता, मेट्रो, अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतू, हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्ग, स्वातंत्र्यवीर सावरकर सागरी सेतू, मुंबई-पुणे एक्सप्रेस वे, मिसिंगलिंक इ. पायाभूत सुविधांचे जाळे निर्माण करून राज्यातील मुंबई-ठाणे-पुणे इत्यादी भागातील प्रवास कमी वेळात व सुखकर करण्याचा प्रयत्न करण्यात येणे, मुंबईत घाटकोपर ते वर्सोवा पहिली लाईन, डी एन नगर-चारकोप ते दहिसर आणि डी एन नगर-बांद्रा ते मानखुर्द दुसरी लाईन, कुलाबा ते अंधेरी (सीप्झ पर्यत) तिसरी लाईन, वडाळाहून घाटकोपर, मुलुंड, ठाणे ते कासारवडवली पर्यंत चौथी लाईन, ठाणे ते भिवंडी, कल्याण पाचवी लाईन, स्वामी समर्थ, जोगेश्वरी ते कांजूरमार्ग सहावी लाईन आणि दहिसर पूर्व ते अंधेरी पूर्व एअरपोर्ट पर्यंत सातवी लाईन अशारितीने मुंबईत मेट्रोचे जाळे उभारण्यात आले असल्याने मुंबईवरील दळणवळणाचा बराचसा ताण कमी होण्यास मदत होणार असणे, तसेच मुंबईतील रस्त्यांवरील जवळपास ३५ टक्के ट्रॅफिक कमी होणार असणे, याकरिता महामुंबई मेट्रो ऑपरेशन कॉर्पोरेशन लि. कंपनीची स्थापना करून संबंधित काम गतीशील करण्यात येणे, नवी मुंबई विमानतळामुळे वाढणा-या लोकसंख्येसाठी नियोजित 'नैना' प्राधिकरणामार्फत २३ गावांच्या नियोजित आराखड्याच्या अंमलबजावणीस गती देण्याची आवश्यकता, सन २०३० पर्यंत एकूण ऊर्जा निर्मितीपैकी ४० टक्के ऊर्जा ही अपारंपारिक पध्दतीने निर्माण करण्याचे उद्दीष्ट असणे, केंद्र शासनाच्या नवीन "प्रधानमंत्री सुर्य घर मोफत वीज योजना"' अंतर्गत रूफ टॉप सोलर पॅनल बसविण्यासाठी ७८ हजार रुपये मर्यादेपर्यंत अनुदान देण्यात

अग्रिम प्रत

येणार असणे, तसेच, ग्राहकांना ३०० युनिट पर्यंतची वीज मोफत मिळणार असणे, राज्यात सर्व उपसा सिंचन योजनांचे सौरऊर्जीकरण करण्यासाठी पुढील दोन वर्षांत आवश्यक तो निधी उपलब्ध करण्याचे प्रस्तावित असणे, वीज सेवा उपलब्ध नसलेल्या राज्यातील सुमारे ३७ हजार अंगणवाडी केंद्रांना सौरऊर्जा संच देण्याचे प्रस्तावित असणे, वन्य प्राण्यांद्वारे होणाऱ्या शेतपीकांच्या नुकसानाला आळा घालण्यासाठी डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजनेंतर्गत शेतकऱ्यांना सौरऊर्जा कुंपनासाठी अनुदान देण्यात येणार असणे, मुंबई महानगरपालिकेच्या विधी खात्यात सन १९७८ ते २०१० या कालावधीत वकीलांचे मानधन, बैठकीसाठीचा खर्च, वाचनालय शुल्क यासह विविध प्रशासकीय कामासाठी १४ कोटी ५७ लाख रूपये आगाऊ रक्कम उचलण्यात आली असल्याची बाब निदर्शनास येणे व विविध माध्यमातून या प्रकरणाचा शोध घेतला जात असताना संबंधित नस्ती सापडत नसल्याने या प्रकरणांची नस्ती बंद करण्याचा निर्णय प्रशासनाकडून घेण्यात आला असल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबईतील एकूण १५०८ छोटे नाले व ३०९ मोठे नाले साफ-सफाईकरिता मुंबई महानगरपालिकेने सुमारे २५० कोटी रूपयांची तरतुद केली असल्याची बाब निदर्शनास येणे, पावसाळयापूर्वी नालेसफाईचे ७५ टक्के काम पूर्ण झाल्याचा पालिकेचा दावा खोटा असल्याची बाब निदर्शनास येणे, २ लाख ७३ हजार मेट्रीक टन गाळ कुठे टाकला, क्षेपणभूमी कुठे आहे इ. बाबी प्रश्नांकित असल्याने प्रशासनाने नालेसफाई कामांची श्वेतपत्रिका काढण्याची आवश्यकता, मुंबईकरांच्या सुरक्षेसाठी आणि मुंबईवर नजर ठेवण्यासाठी शासनाकडून सुमारे १ हजार कोटी रूपयांचा निधी दिला असल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबईकरांना तात्काळ आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी मुंबईत मोबाईल मेडिकल युनिट सुरु करण्यात आले असणे, राज्यातील महानगरपालिका बरखास्त करून तेथील कार्यभार दिर्घकाळ प्रशासक चालवित असल्याने काही ठिकाणी प्रशासकांकडून मनमानी होत असल्याचे व तेथील माजी नगरसेवकांचा योग्य मान राखला जात नसल्याचे निदर्शनास येणे, मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर यासारख्या मोठया शहराचा मेगापॉलिस मेटाव्हर्स प्रकल्पाच्या मदतीने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक गतीने विकास करण्याचा व ही शहरे झोपडपट्टीमुक्त करण्याचा तसेच, पायाभुत सुविधा उभारुन पर्यावरणपूरक विकास करण्याच्यादृष्टीने शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अग्रिम प्रत

**(ग) (शुक्रवार, दिनांक २८ जून, २०२४, शनिवार, दिनांक २९ जून, २०२४, सोमवार, दिनांक १ जुलै, २०२४, मंगळवार, दिनांक २ जुलै, २०२४, बुधवार, दिनांक ३ जुलै, २०२४, गुरुवार, दिनांक ४ जुलै, २०२४, शुक्रवार, ५ जुलै, २०२४ व सोमवार, दिनांक ८ जुलै, २०२४ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री अंबादास दानवे,** सतेज ऊर्फ बंटी पाटील, शशिकांत शिंदे, सर्वश्री अशोक ऊर्फ भाई जगताप, सचिन अहिर, अरुण लाड, अभिजीत वंजारी, राजेश राठोड, सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, किरण सरनाईक, सुनिल शिंदे, जयंत आसगावकर, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यात सततचा पाऊस, नापिकी, दुष्काळ, टंचाई, अवकाळी, कर्जबाजारीपणा, कृषी विभागाच्या अपुऱ्या सोईसुविधा यामुळे शेतकरी संकटात आलेला असणे, परिणामी शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये झालेली वाढ, शेतमालाला हमीभाव न मिळणे, बियाणे, खते यांच्या दरात झालेली प्रचंड वाढ, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याकडे होत असलेले दुर्लक्ष, शासनाने दुष्काळग्रस्त १०२१ महसूल मंडळांमध्ये सवलती जाहिर करुनही अद्याप शेतकरी वंचित असणे, पीक विम्याचे नियमितपणे हप्ते भरुनही शेतकरी पीक विम्यापासून वंचित राहणे, तथापि, विमा कंपन्या दिवसेंदिवस मालामाल होणे, राज्यात एकीकडे भीषण पाणी टंचाई असताना टँकर माफीयांकडून नागरिकांची होत असलेली लूट, पाणी टंचाईचा प्रश्न सोडविण्यासाठी राबविण्यात आलेली "हर घर नल का जल" योजना अपयशी ठरणे, चारा छावण्या उभारण्याबाबत होत असलेले दुर्लक्ष, परिणामी पशुधनाचे झालेले नुकसान, दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी संकटात असताना शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करण्याकडे होत असलेले जाणीवपुर्वक दुर्लक्ष, माहे जानेवारी ते मे, २०२४ या कालावधीत झालेल्या अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई अद्याप न मिळणे, कांद्यावर निर्यात बंदी असल्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी शासनाच्या चुकीच्या निर्यात धोरणांमुळे अडचणीत आलेला असणे, शेतकऱ्यांना योग्य तो लाभ मिळण्यासाठी कांदा, सोयाबीन, कपाशी, तूर, हरभरा, भुईमूग, धान, उडीद, मूग, हळद, मिरची इ.

अग्रिम प्रत

पिकांना योग्य तो दर मिळवून देण्यास शासनाला आलेले अपयश, परिणामी शेतकऱ्यांचे होत असलेले आर्थिक नुकसान, धान, संत्रा उत्पादक शेतकरी नुकसान भरपाई पासून वंचित असणे, दूध उत्पादक शेतकऱ्यांना सरकारने घोषित केलेले अनुदान अद्यापही मिळालेले नसणे, राज्य सरकारने ७५ हजार पद भरती करण्याच्या घेतलेल्या निर्णयाची अजूनही पुर्तता केलेली नसणे, त्यामुळे अनेक तरुण-तरुणी रोजगारापासून वंचित असणे, जुन्या पेन्शन योजनेत असलेल्या त्रुटी, शिक्षकांच्या संच मान्यतेमध्ये असलेल्या त्रुटी, शक्तिपीठ महामार्गास शेतकऱ्यांचा विरोध असून प्रकल्प रेटण्याचा सुरु असलेला प्रयत्न, स्मार्ट प्रिपेड योजनेमुळे ठराविक उद्योजकांना फायदा होणार असणे, वीज दरामध्ये झालेली वाढ, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत होणारी भरती प्रलंबित असणे, महागाईत झालेली वाढ, राज्य शासनामार्फत घेण्यात आलेल्या विविध परिक्षांमध्ये झालेली अनियमितता, तसेच गत दोन वर्षात शासनाच्या विविध विभागामध्ये अनेक भ्रष्टाचार व गैरव्यवहार उघडकीस येणे, कृषी उद्योग विकास महामंडळामध्ये मोठ्या प्रमाणावर होत असलेला भ्रष्टाचार, मेटाल्डिहाइड कीटकनाशके, कापूस साठवणपिशव्या, फवारणी पंप, डिजिटल मृदा आर्द्रता संवेदक या निविष्ठांच्या खरेदी प्रक्रियेमध्ये झालेला गैरव्यवहार, सेंद्रीय शेतीसाठीचा निधी अधिकाऱ्यांच्या जाणीवपुर्वक दुर्लक्षामुळे अखर्चित राहणे, चंद्रपूरच्या महाऔष्णिक वीज निर्मिती केंद्रात निविदा प्रक्रिया व साहित्य खरेदीत करण्यात आलेला भ्रष्टाचार, आदिवासी विकास विभागात फर्निचर खरेदीमध्ये झालेला कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार, सार्वजनिक आरोग्य विभागात टक्केवारी, वसुली, बदल्या-पदोन्नतीत गैरप्रकार, जेष्ठता डावलून पदस्थापना, औषध खरेदीमध्ये झालेला हजारो कोटींचा गैरव्यवहार, कामगार विभागांतर्गत बांधकाम कामगार मंडळामध्ये विविध योजनांमध्ये झालेला गैरव्यवहार, राज्य उत्पादन शुल्क विभागात सुरु असलेला भ्रष्टाचार तसेच आकृतीबंध पुनर्रचनेत झालेला गैरव्यवहार, अन्न व औषध प्रशासन विभागामध्ये सुरु असलेला भ्रष्टाचार, महसूल विभागात वाढलेला भ्रष्टाचार व त्यामुळे सर्वसामान्यांची होत असलेली परवड, वाळू धोरण राबविण्यास शासनास आलेले अपयश, त्यामुळे सर्व सामान्य नागरिकांची वाळू माफियांकडून होत असलेली फसवणूक, सातारा जिल्ह्यातील झाडाणी, ता. महाबळेश्वर गावात उच्चपदस्थ शासकीय अधिकाऱ्यांसह तेरा जणांनी ६४० एकर जमीनीची अत्यल्प दरात केलेली खरेदी, निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून देणग्या

अप्रकाशित प्रत

देणाऱ्या कंपन्यांना राज्यातील विविध प्रकल्पांची कोट्यवधी रुपयांची देण्यात आलेली कंत्राट, संचालक, नगररचना, पुणे यांनी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या निधीचे योग्य प्रकारे नियोजन न केल्यामुळे हा निधी व्यपगत होणे, लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीच्या कालावधीत राजकीय दबावापोटी अधिकारी यांनी केलेला गैरव्यवहार, पाणी पुरवठा विभागात जलजीवन मिशन अंतर्गत कामाचे वाटप करताना ई-निविदा न राबविता केलेला गैरव्यवहार, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."

(घ) **(गुरुवार, दिनांक ४ जुलै, २०२४, शुक्रवार, ५ जुलै, २०२४ व सोमवार, दिनांक ८ जुलै, २०२४ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव)** –

**सर्वश्री सतेज ऊर्फ बंटी पाटील**, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अशोक ऊर्फ भाई जगताप, अरुण लाड, अभिजीत वंजारी, राजेश राठोड, सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, किरण सरनाईक, सुनिल शिंदे, जयंत आसगावकर, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** –

"राज्यातील ढासळलेली कायदा व सुव्यवस्था, हत्या, बलात्कार, अपहरण, दरोडे, घरफोड्या, भ्रष्टाचार यासारख्या गुन्ह्यांना आळा घालण्यात शासनाला आलेले अपयश, गुन्हेगारांवर वचक बसण्याऐवजी त्यांचे वाढलेले मनोधैर्य, महिलांवरील लैंगिक अत्याचारात झालेली वाढ, नागपूर शहरातून तीन वर्षात सुमारे ११९५ अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याने उपराजधानीतील पालकांमध्ये पसरलेले भितीचे व चिंतेचे वातावरण, पुण्यात वाढत असलेले ड्रग्ज, पब्ज, अवैध बार याकडे गृह तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाचे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे तरुणांमध्ये वाढत असलेली व्यसनाधिनता व गुन्हेगारी, राज्यात मुंबई, नागपूर व विशेषतः पुणे शहरात कोयता गँग व इतर गुन्हेगारीने मांडलेला उच्छाद, कल्याणीनगर हिट अँड रन प्रकरणानंतर शहरामध्ये कायदा व सुव्यवस्थेवर निर्माण झालेले प्रश्नचिन्ह, पुण्याच्या हिट अँड रन प्रकरणी पोलिसांची व ससून रुग्णालय प्रशासनाची संशयास्पद भूमिका, आरोपी बिल्डर पुत्राला वाचविण्यासाठी ससून रुग्णालयातील डॉक्टरांनी रक्त नमून्यामध्ये फेरफार केल्याचे निदर्शनास येणे, गडचिरोली जिल्ह्यातील बारसेवाडा येथे जादूटोणा केल्याच्या संशयातून एका पुरूषासह

अप्रकाशित मत

महिलेस जिवंत जाळून ठार केल्याची घडलेली धक्कादायक घटना, कोपर्डी येथे मागासवर्गीय तरुणाला जातीवाचक शिवीगाळ करुन नंतर नग्न करुन मारहाण केल्याने संबंधित तरुणाने केलेली आत्महत्या, राज्यात वकिलांवर होत असलेले प्राणघातक हल्ले, राहुरी येथील पाच लाखांच्या खंडणीसाठी आरोपींनी वकील दाम्पत्याचे अपहरण करुन केलेल्या हत्येमुळे राज्यात कायदा सुव्यवस्थेचा उडालेला बोजवारा, कायद्याचा वचक न राहिल्याने विद्यमान लोकप्रतिनिधींनी पोलीस ठाण्यात केलेला गोळीबार व दहिसर येथे माजी नगरसेवकाची करण्यात आलेल्या हत्येचा तपास अद्यापही पूर्ण न होणे, नागरिकांमध्ये निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना, इंदापूरचे तहसिलदार व रत्नागिरीचे उपजिल्हाधिकारी यांच्यावर वाळू माफियांकडून झालेला भ्याड हल्ला, एका महिला पत्रकारानी राजकीय पक्षाच्या उमेदवाराबाबत बातमी छापल्याने गुंडांनी त्यांना धमकविल्याचे निदर्शनास आलेला निंदनिय प्रकार, मराठा आंदोलकांवर आंदोलन मागे घेण्यात येऊन असंख्य गुन्हे दाखल करण्यात येणे, जालन्यात एका कुटुंबावर हल्ला करून त्यांचे घर पाडल्याचा उघडकीस आलेला प्रकार, मिरा-रोड येथील लोकप्रतिनिधींनी पालिकेच्या कनिष्ठ अभियंत्यास केलेली मारहाण, हिंगोलीच्या लोकप्रतिनिधींनी महावितरण कर्मचाऱ्यास फोनद्वारे दिलेली धमकी, यामुळे प्रशासनाचे मनोधैर्य खच्चीकरण होत असल्याने जनसामान्यात शासनाविषयी पसरत असलेली असुरक्षिततेची भावना, राज्यातील पोलिसांच्या अंतर्गत समस्यांचे निवारण न होणे, वीस-बावीस तास काम करणारे पोलिस कर्मचारी, त्यांच्या निवासाचे प्रश्न, मानसिक आरोग्य आणि मानसिक आरोग्याअभावी निर्माण होणारे अन्य प्रश्नांकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, राज्यात अंमली पदार्थांचा झालेला सुळसुळाट, गुटखा, विदेशी सिगारेट, ई-सिगारेट व तत्सम बंदी असलेल्या पदार्थांची बेकायदेशीररित्या ठिकठिकाणी सुरू असलेली विक्री, राज्यातील नगरपालिका / महानगरपालिकांमध्ये वाढत चाललेला भ्रष्टाचार, मुंबई महानगरपालिका, MSRDC आणि MMRDA मध्ये प्रकल्पाच्या किंमतीमध्ये केलेली छुपी वाढ, फुगविलेले अंदाजपत्रक व केलेला भ्रष्टाचार, सिडकोमध्ये होत असलेला भ्रष्टाचार, कौशल्य विकास व उद्योजकता विभागामध्ये सुरु असलेले गैरप्रकार, आदिवासी विकास विभागातील भ्रष्टाचार, सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये सुरु असलेले गैरव्यवहार व भ्रष्टाचाराचा उद्रेक, अन्न व औषध प्रशासनामधील भ्रष्टाचार, अटल सेतूच्या कामातील अनियमितता, झोपडपट्ट्यांमधील स्वच्छतेच्या

अप्रकाशित प्रत

निविदेत कोट्यवधी रुपयांची अनियमितता, नाशिकच्या देवळाली शिवारातील टीडीआर गैरप्रकार, शालेय शिक्षण विभागातील शालेय गणवेश खरेदीमध्ये झालेला भ्रष्टाचार, मुंबई महानगरपालिकेत वाढत असलेला भ्रष्टाचार, नगरविकास विभागांतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त निधी अखर्चित राहणे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने तयार केलेला चुकीचा विकास आराखडा, राज्यात औद्योगिक क्षेत्रांमधील कारखान्यांमध्ये विशेषतः नागपूर मध्ये सुरु असलेली स्फोटांची मालिका व त्यामुळे मोठ्या प्रमाणात झालेली वित्त व जीवितहानी, रासायनिक कंपन्यांमधून रसायनयुक्त पाणी प्रक्रिया न करता नद्यांमध्ये सोडले जात असल्यामुळे होणारे जलप्रदूषण, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**चौदा : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

(१) **श्रीमती उमा खापरे,** सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, **वि.प.स.**

"**भिडेवाडा येथे सावित्रीबाई फुले यांचे राष्ट्रीय स्मारक उभारण्याबाबत**" या विषयावरील श्री. सत्यजित तांबे, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्र. २२७१२ ला दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

(२) **सर्वश्री अमोल मिटकरी,** विक्रम काळे, सतिश चव्हाण, **वि.प.स.**

"**अकोला जिल्ह्यातील कुंभारी-डोंगरगाव, कुंभारी-मासा, कुंभारी-बाभूळगाव जुना रस्ता आणि कुंभारी सोनाळा या रस्त्यांची झालेल्या दुरवस्थेबाबत**" या विषयावरील श्री. अमोल मिटकरी व इतर वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्र. २२९०८ ला दिनांक १ जुलै, २०२४ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ८ जुलै, २०२४

**जितेंद्र भोळे**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद

अप्रकाशित